महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

अकोला, गुरुवार, दि. २३ जून २०११

# शाळांमध्ये राबणार पर्यावरण मित्र अभियान

## शैक्षणिक सत्रापासून सुरुवात
## विद्यार्थ्यांना राबवावे लागणार प्रकल्प

विवेक चांदूरकर | दि. २२ (कारंजा)

पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास तसेच जैवविविधतेची हानी रोखण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने सर्व शाळांमध्ये पर्यावरण मित्र अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाला आगामी शैक्षणिक सत्रापासून सुरुवात होणार आहे.

केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय, पर्यावरण शिक्षण संस्था (सीईई), आर्सीलॉ मित्तल फाऊंडेशनच्या वतीने संपूर्ण देशात दोन लाख शाळा, विद्यालयांमध्ये पर्यावरण मित्र प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मुले देशाचे भविष्य आहेत. पर्यावरणाचे होत असलेले नुकसान थांबवायचे असेल तर त्यांच्यामध्ये पर्यावरणाबाबत प्रेम, जाणीव निर्माण करणे गरजेचे आहे. त्याकरिता सदर अभियान विद्यार्थ्यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.



सीईईचे पुणे येथील सतीश आवटे यांनी अभियानाची माहिती देताना सांगितले की, या पर्यावरण मित्र प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल केवळ जागृतीच करण्यात येणार नाही तर गाव पातळीवर निसर्ग संवर्धनाचे छोटे छोटे प्रकल्प राबवून घेण्यात येणार आहेत. तसेच पर्यावरणविषयक समस्यांच्या सोडवणुकीसाठी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती आणि प्रश्न सोडविण्याची क्षमता निर्माण करणे, हा या अभियानामागचा हेतू आहे. हा प्रकल्प जिल्ह्यातील काही निवडक शाळांमध्ये केवळ सहा ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिताच आहे. हा प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, माहिती पुस्तिका प्रत्येक जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांकडे पोहोचविण्यात आल्या आहेत. काही जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांचा (एनजीओ) सहभाग घेण्यात येणार आहे.

सध्या शहरांसह गावपातळीवरही पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. आगामी काळात भावी पिढीला प्रदूषणविरहित हवा तसेच निरोगी अन्न-धान्य देण्यासाठी पर्यावरणाचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

त्याकरिता गावपातळीवर विद्यार्थ्यांपासून सुरुवात करणे गरजेचे होते. त्यामुळे सदर प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना पाणी, जैवविविधता, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा, लोकसंस्कृती या विषयांवर छोटे छोटे संशोधनात्मक प्रकल्प राबवायचे आहेत. यामुळे पर्यावरणाचे रक्षण होणार असून, विद्यार्थ्यांच्या चिकित्सक बुद्धीला चालना मिळणार आहे.

# अपना अकोला

लोकमत समाचार शुक्रवार, 9 सितंबर 2011


हताशा... सरकारी मदद बेनतीजा..

# 10 वर्षों में तीन से अधिक आत्महत्या वाले 121 ग्राम

## सहायता के परिणाम की स्वयंसेवी संस्थाएं करेंगी जांच

अकोला। 8 सितंबर (लोस सेवा)

किसान आत्महत्या पर रोक लगाने के लिए केंद्र एवं राज्य सरकार द्वारा चलाई गई विभिन्न योजनाओं का क्या परिणाम हुआ? जिसकी खोज करने के लिए ग्रामीण स्तर पर आत्महत्या ग्रस्त परिवारों की जानकारी ली गई है. विगत एक दशक में तीन से ज्यादा किसान परिवारों में आत्महत्या करने वाले 121 गांवों का समावेश किया गया है. आत्महत्या को रोकने के लिए क्या और कैसे प्रयास करने चाहिए? जिसका प्रारूप तय किया जा सकता है.

विदर्भ के वर्धा जिले समेत यवतमाल, अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम जिले में आत्महत्या का प्रमाण ज्यादा था. जिस पर केंद्र और राज्य सरकार ने विशेष पैकेज दिए, लेकिन पैकेज के दौरान भी आत्महत्याओं का प्रमाण कम नहीं हुआ. इसलिए सरकार और भी चिंता होने लगी. पैकेज का परिणाम क्या हुआ? इसकी छानबीन करने पर आत्महत्या का प्रमाण ज्यादा होने वाले गांवों को निश्चित किया गया है. वर्ष 2001 से 2011 तक आत्महत्या करने वाले गांवों की जानकारी ली गई. जिसमें तीन से अधिक आत्महत्या करने वाले 121 गांव पाए गए. उसमें से सबसे अधिक अकोला तहसील में 27 गांवों का समावेश है तथा सबसे कम तेल्हारा तहसील में 9 गांवों का समावेश है.

### तीन से अधिक आत्महत्या वाले गांव

| | | |
|---|---|---|
| अकोला | - | 27 |
| बार्शिटाकली | - | 24 |
| मुर्तिजापुर | - | 18 |
| पातुर | - | 19 |
| बालापुर | - | 10 |
| तेल्हारा | - | 09 |
| अकोट | - | 14 |
| **कुल** | - | **121** |

बार्शिटाकली तहसील में 24, अकोट में 14, बालापुर में 10, पातुर में 19 तथा मुर्तिजापुर तहसील में 18 गांवों का समावेश है. (शेष पृष्ठ ३ पर)

पृष्ठ 1 का शेष

## 10 वर्षों में तीन...

उक्त सभी गांवों में तीन से अधिक आत्महत्याएं हुई हैं. आखिरकार किसानों को आत्महत्या क्यों करनी पड़ी, दी गई सहायता योजनाओं का परिणाम क्या हुआ, आगे और क्या प्रयास किए जाएंगे? इसलिए अब स्वयंसेवी संस्थाओं की ओर से जांच की जाएंगी, जिसके लिए शीघ्र ही संस्थाओं का चयन किया जाएगा, ऐसी जानकारी दी गई है.

लोकमत | रविवार,
दि. ७ ऑगस्ट २०११

## शस्त्राच्या धाकावर होते शोषण अन् लुटमारही

# वारांगणांना हवे गुंडांपासून संरक्षण

**अकोला** | दि. ७ (प्रतिनिधी)

**अकोल्यातील** गुंडांच्या दहशतीचे चटके परिस्थितीमुळे देहविक्रीच्या व्यवसायात गुंतलेल्या अकोल्यातील महिला-मुलींनाही सोसावे लागत आहेत. गुंड कधी शस्त्राच्या धाकावर शोषण करतात तर कधी ते लुटमार करतात.

रितसर वस्ती थाटून देहविक्रीचा व्यवसाय शहरात एकाच भागात चालतो. या भागातील महिला-मुलींना ावगुंडांचा सर्वांत जास्त त्रास आहे.




पैसे न देताच शस्त्राच्या धाकावर हे गुंड व त्यांचे चेलेचपाटे शरीरसुखाची मागणी करतात. ही मागणी मोफतमध्ये पूर्ण न केल्यास हे गुंड हल्ला करतात. कधी तर शारीरिक शोषणानंतर हे गुंड पैशांचीही मागणी करतात. पैसे न दिल्यासही मारहाण करतात. एवढेच काय मध्यस्थीचा प्रयत्न करणाऱ्यास मारहाण करण्यात येते. गुंडांपासून संरक्षण व्हावे, एवढी माफक अपेक्षा देहविक्रीच्या व्यवसायात मनाने घायाळ झालेल्या महिला व मुलींची आहे. मात्र त्यांची ही अपेक्षाही पूर्ण होत नाही. मुळात वारांगणांकडे पाहण्याची दृष्टीच कुणाची चांगली नसते. म्हणूनच पोलीसही त्यांच्या तक्रारीकडे गांभीर्याने पाहत नाहीत.

पोलिसांचा कोणताच त्रास नसल्याचे या महिला व मुली प्रांजळपणे सांगतात. मात्र, पोलिसांकडे तक्रार घेऊन गेल्यास ते गांभीर्याने लक्ष देत नाहीत. इतरांप्रमाणे आम्हालाही सुरक्षित जीवन जगण्याचा अधिकार आहे. पोलिसांनी आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून गुंडांचा बंदोबस्त करावा, अशी या महिला व मुलींची रास्त मागणी आहे.



लोकमत | शुक्रवार, दि. ३० डिसेंबर २०११

# ज्येष्ठांच्या सायकल रॅलीचे अकोल्यात उत्स्फूर्त स्वागत



सायकल रॅलीत सहभागी ज्येष्ठ नागरिक.

**अकोला** | दि. २९ (प्रतिनिधी)

**देशभर** यशस्वीपणे सायकल रॅलीचे आयोजन केल्यानंतर पुणे सायकल प्रतिष्ठानची सायकल आज अकोल्यात आली. ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग असलेल्या या रॅलीचे अकोल्यातील ज्येष्ठ नागरिक संघाने उत्स्फूर्त स्वागत केले.

पुण्याहून २५ डिसेंबरला निघालेली ही सायकल रॅली ३१ डिसेंबरला नागपूरला पोचणार आहे. शारीरिक आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विषयांवर जनजागृतीकरिता ही रॅली काढण्यात आली आहे. अहमदनगर, औरंगाबाद, जालना, मेहकर, अकोला, अमरावती, कारंजा घाटगे मार्गे ही रॅली नागपूरला जाणार आहे. रॅलीत सहभागी ज्येष्ठ नागरिक सायकलचे फायदे यासोबतच हिमोग्लोबिन व अमेनियावाढीच्या विरोधात हे ज्येष्ठ नागरिक जनजागृती करीत आहेत. रॅलीत निवृत्त विंगकमांडर यशवंत मराठे, डॉ. शिरीष पटवर्धन, सहस्त्रनाम, विनायक ढेरे, व्ही.व्ही. भिडे, शशांक वैद्य, विनायक मराठे, वेदप्रकाश, मृगेंद्र, काकी, शिला परळीकर, अपर्णा महाजन व सारा हे रॅलीत सहभागी झाले आहेत.

रॅलीचे अकोल्यात आगमन झाल्यानंतर गांधी-जवाहरबागेत जाऊन दिवंगत स्वातंत्र्य सैनिकांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर हॉटेल रायझिंगसन येथे रॅलीतील ज्येष्ठ नागरिकांचा अकोल्यातील ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने स्वागत करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अशोक कुळकर्णी, माजी अध्यक्ष ना.म. इंगळे, सत्यनारायण रांदड व ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्या, ३० डिसेंबर रोजी कोठारी कॉन्व्हेंटमध्ये ही सायकल रॅली जाणार असून, याठिकाणी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.